पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी : ०२१७-२७४४७७१/७२/७३ (११ लाईन्स), Ext- १२५ फॅक्स : ०२१७-२३५१३०
संकेतस्थळ : www.sus.ac.in ई-मेल: phd@sus.ac.in

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।
NAAC Accredited-2022
'B++ Grade (CGPA 2.96)

संशोधन विभाग **Research Section**

संदर्भ क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२६/ 8637 14/10/2026

अत्यंत महत्वाचे

प्रति,
प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्था/प्रस्तुत विद्यापीठ संकुले,
पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय : संशोधन केंद्राची अद्ययावत माहिती Edulab Software प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने नमूद करण्याबाबत.

संदर्भ :
१. प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२६/२३९२ दि. १७-३-२६ रोजीचे पत्र
२. प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२६/२८९४ दि. ०२-४-२६ रोजीचे पत्र
३. प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२६/३५२० दि. २१-४-२६ रोजीचे पत्र
४. प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२६/५७९४ दि. २३-६-२६ रोजीचे पत्र
५. प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२६/७४९३ दि. १३-८-२६ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये (PET १०) प्रवेश प्रक्रियेकरीता संलग्नित पदव्यूत्तर (PG) महाविद्यालयात (संधोधन केंद्र मान्यता असलेल्या) पूर्णवेळ कार्यरत मार्गदर्शकांची प्रवेश क्षमतेबाबची माहिती व संशोधन केंद्राची अद्ययावत माहिती Edulab Software प्रणालीमध्ये महाविद्यालयाकडील लॉगीनमधून भरुन आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करुन ऑनलाईनरित्या सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि ब-याच महाविद्यालयांनी सदर माहिती मुदतीत भरली नसल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आल्याने संदर्भ क्र. २, संदर्भ क्र. ३ संदर्भ क्र. ४ व संदर्भ क्र. ५ अन्वये विषयांकित माहिती भरुन आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करण्यास मुदतवाढ देण्यात आलेली होती. तथापि संलंग्नित संकुलांनी / महाविद्यालयांनी पीएच.डी. संशोधन केंद्राची अद्ययावत माहिती Edulab Software प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने नमूद केली नसल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आलेले आहे.

त्याअनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सर्व संकुलातील व महाविद्यालयातील पीएच.डी. संशोधन केंद्राना आय.डी. (ID) क्रमांक दयावयाचा असल्याने संबंधित संकुलांनी व महाविद्यालयांनी पीएच.डी. संशोधन केंद्राची अद्ययावत माहिती Edulab Software प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने नमूद करुन आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करावीत, तदनंतर पीएच.डी. संशोधन केंद्रांना आय.डी. (ID) देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

तसेच Edulab Software प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने पीएच.डी. संशोधन केंद्रांची अद्यावत माहिती विद्यापीठास वेळेत प्राप्त न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संशोधन केंद्रांचे प्रमुख / प्राचार्य / संचालक यांची राहिल, याची नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात काही तांत्रिक अडचण असल्यास ९१५२२५२०४५ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा.

आपला स्नेहांकित,

(डॉ. अ.सु.साळुंखे)
उपकुलसचिव

प्रत : १) मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ. २) मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) गोपनीय फर्म यांना सदर पत्राची प्रत देऊन कळविण्यात येते की, जी संकुले / महाविद्यालये पीएच.डी. संशोधन केंद्राची माहिती अद्ययावत करतील त्या पीएच.डी. संशोधन केंद्रांना विभागाने दिलेल्या सूचनांप्रमाणे ID (आय.डी.) देण्याची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करावी.